# 'द न्यूज बिज टाईम्स'

दि. ३०/८/२०२६ | पिंपरी, महाराष्ट्र, | thenewzbiz@gmail.com | वर्ष - दुसरे | डिजीटल आवृती


## ज्येष्ठ नागरिकांना ऑनलाईन फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन



पिंपरी, प्रतिनिधी : मासुळकर कॉलनी परिसर, पिंपरी येथील ज्येष्ठ नागरिक संघात डॉ. डी. वाय. पाटील आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, पिंपरीच्या क्विक हील फाउंडेशन सायबर वॉरियर क्लब यांच्या वतीने सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा या उपक्रमांतर्गत सायबर सुरक्षा जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले होते. माय डेटा, माय रिस्पॉन्सिबिलिटी या वार्षिक संकल्पनेनुसार आयोजित या सत्रात सुमारे ५० ज्येष्ठ नागरिकांनी सहभाग घेतला.

सायबर वॉरियर्स ईशा गणेश कालेकर आणि प्रियांका सिंघ यांनी संवादात्मक पद्धतीने उपस्थितांना मार्गदर्शन केले. यावेळी ओटीपी स्कॅम, फेक बँक केवायसी स्कॅम, युपीआय स्कॅम, फेक कस्टमर केअर, व्हॉट्सअॅप व्हिडिओ कॉल स्कॅम यांसारख्या ऑनलाइन फसवणुकीच्या प्रकारांची उदाहरणांसह माहिती देण्यात आली. अनोळखी व्यक्तींना ओटीपी, पिन, पासवर्ड किंवा बँकविषयक गोपनीय माहिती न देणे, संशयास्पद लिंकवर क्लिक न करणे आणि कोणताही आर्थिक व्यवहार करण्यापूर्वी माहितीची खात्री करणे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

यावेळी सामाजिक अभियांत्रिकीच्या माध्यमातून नागरिकांचा विश्वास संपादन करून गोपनीय माहिती मिळविण्याच्या पद्धतींबाबतही चर्चा करण्यात आली. फोन, संदेश किंवा व्हिडिओ कॉलद्वारे तातडी निर्माण करून पैसे अथवा वैयक्तिक माहिती मागणाऱ्या व्यक्तींशी व्यवहार न करण्याचे आवाहन करण्यात आले. डिजिटल उपकरणे व खात्यांच्या सुरक्षिततेसाठी मजबूत पासवर्ड, गोपनीयता आणि अधिकृत माध्यमांचा वापर करण्याचे महत्त्व स्पष्ट करण्यात आले. सत्रादरम्यान प्रत्यक्ष सायबर फसवणुकीच्या घटनांवर आधारित चर्चा घेण्यात आली. सहभागींच्या प्रश्नांना उत्तरे देत सुरक्षित डिजिटल व्यवहारासाठी आवश्यक खबरदारी सांगण्यात आली. सायबर गुन्हा घडल्यास नॅशनल सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधणे तसेच नॅशनल सायबर क्राइम रिपोर्टिंग पोर्टल (https://www.cybercrime.gov.in) वर तक्रार नोंदविण्याची प्रक्रिया समजावून सांगण्यात आली.

यावेळी रजनी शिरुडे उपस्थित होत्या. आदित्य माडावे, सायबरसिक्युरिटी इंजिनिअर, आयटीई सॉफ्टवेअर सोल्युशन्स यांचे मार्गदर्शन मिळाले. कॉलेजचे प्राचार्य डॉ. रणजित पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. क्लबचे महाविद्यालयीन समन्वयक प्रा. सत्यवान कुणीर यांच्या समन्वयातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.